# मुंबई शहर कबड्डी असोसिएशन

संलग्न : महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशन

नोंदणी : मुंबई सार्वजनिक विश्वस्त अधिनियम - १९५० क्रमांक एफ -४२७२



| मारुती रामा जाधव<br>आजीव अध्यक्ष | भाई अर्जुनराव जगताप (आमदार)<br>अध्यक्ष | शिवकुमार उदय लाड<br>गो. वी. पारगांवकर<br>उपाध्यक्ष | मनोहर शावजी इंदुलकर<br>कार्याध्यक्ष |
|---|---|---|---|
| रामचंद्र मारुती जाधव<br>अनिल सदाशिव घाटे<br>कार्योपाध्यक्ष | विश्वास तुकाराम मोरे<br>प्रमुख कार्यवाह | भरत नबाजी मुळे<br>शरद कृष्णा काळगण<br>संयुक्त कार्यवाह | शुभांगी दिनेश पाटील<br>खजिनदार |


जावक क्रमांक : मु.श.क.अ./ ३३/२०२६-२५.                दिनांक : २८/०७/२०२६.

## "मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडूंना जाहीर आवाहन"

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या निर्देशानुसार जिल्ह्यातील अतिउत्कृष्ट (Sportperson of Outstanding Merit) माजी राष्ट्रीय व आंतर राष्ट्रीय कबड्डी खेळाडूंना अर्ज करण्याचे जाहीर आवाहन केले आहे.

राष्ट्रीय क्रीडा प्रशासन अधिनियम २०२५ व राष्ट्रीय क्रीडा सुशासन नियम, २०२६ यांच्या अनुषंगाने ही प्रक्रिया राबविण्यात येत असून, पात्र खेळाडूंमधून एक पुरुष व एक महिला प्रतिनिधीची निवड करण्यात येणार आहे. अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत दिनांक ७ ऑगस्ट २०२६ असून, अर्ज ई-मेलद्वारे kabaddimumbai@yahoo.in किंवा मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या कार्यालयात प्रत्यक्ष सादर करता येणार आहेत. मुदतीनंतर प्राप्त होणाऱ्या अर्जाचा विचार केला जाणार नसल्याचे स्पष्ट करण्यात आले आहे.

अर्जदाराने भारत किंवा महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेले असावे. तसेच मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या पुरुष व महिला संघात खेळलेले असणे, खेळातील उत्कृष्ट कामगिरीची नोंद असणे आणि कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची किंवा अपात्रतेची कारवाई झालेली नसणे आवश्यक आहे.

निवड झालेल्या प्रतिनिधींना महाराष्ट्र राज्य कबड्डी असोसिएशनच्या व मुंबई शहर कबड्डी असोसिएशनच्या पुढील निवड प्रक्रियेत सहभागी होण्याची संधी मिळणार असून, त्यांना असोसिएशनच्या सर्वसाधरण सभेची अधिकृत सदस्यत्व व मतदानाचा अधिकारही प्राप्त होणार आहे.

मुंबई शहर कबड्डी असोसिएशनचे सर्व पात्र माजी राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय कबड्डी खेळाडूंना आवश्यक कागदपत्रांसह विहित मुदतीत अर्ज सादर करून या महत्चपूर्ण प्रक्रियेत सहभागी व्हावे, असे आवाहन प्रमुख कार्यवाह श्री. विश्वास मोरे यांनी केले आहे.

**पात्रतेचे निकष :-**

१. भारत किंवा महाराष्ट्र राज्याचे राष्ट्रीय अथवा आंतरराष्ट्रीय स्तरावर प्रतिनिधित्व केलेले असावे.
२. मुंबई शहर कबड्डी असोसिएशनची संलग्न राहून खेळलेले असणे आवश्यक.
३. खेळातील उत्कृष्ट कामगिरीची नोंद असणे आवश्यक.
४. कोणत्याही प्रकारची शिस्तभंगाची किंवा अपात्रतेची कारवाई झालेली नसणे आवश्यक.

**आवश्यक कागदपत्र** :- १) राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय सहभागाची प्रमाणपत्रे २) मेजर ध्यानचंद खेलरत्न, अर्जुन पुरस्काराचे पुरावे. ३) जन्मदिनांक व आधारकार्ड पुरावे. ४) स्वयंघोषणापत्र

**महत्वाच्या गोष्टी :-**

**अर्ज करण्याची अंतिम मुदत** :- दिनांक ७ ऑगस्ट २०२६
**ई-मेल आयडी** :- kabaddimumbai@yahoo.in
**अर्ज सादर करण्याचे ठिकाण** :- मुंबई शहर कबड्डी असोसिएशन कार्यालय, वडाळा, मुंबई.
**निवड होणारे प्रतिनिधी** :- एक पुरुष व एक महिला
**अधिक माहिती व**
**अर्जासाठी वेबसाईट** :- www.mumbaishaharkabaddi.com

मुंबई शहर कबड्डी असोसिएशन, भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई-३१


कार्यालय : भारतीय क्रीडा मंदिर, वडाळा, मुंबई - ४०० ०३१. फोन / फॅक्स : ०२२ २४१५ २९९९
ई-मेल : kabaddimumbai@yahoo.in, वेबसाईट : www.mumbaishaharkabaddi.com